महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४७७(२)/२०१९/चौदा-अ दिनांक :१७ ऑगस्ट, २०२१.

# घोषणा

## मुलाखत कार्यक्रम

## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१९

### पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ५०/२०१८ व मुख्य परीक्षा जाहिरात क्रमांक ०७/२०१९.

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१९ लेखी परीक्षेचा सुधारित निकाल दिनांक ०६ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेच्या सुधारित निकालानुसार एकूण १०४ उमेदवार नव्याने मुलाखतीकरिता अर्हताप्राप्त ठरले आहेत. सदर १०४ उमेदवारांच्या मुलाखती बुधवार व गुरुवार दिनांक २५ व २६ ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्याचे आयोजित करण्यात आले आहे. सदर मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** कोरोना विषाणू (COVID-19 ) चा प्रादुर्भाव असल्याने उमेदवारांनी मुलाखतीस येताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

(i) मुलाखतीला उपस्थित रहाणा-या सर्व उमेदवारांनी पूर्ण वेळ किमान तीन पदरी कापडाच्या मास्कचा वापर करणे अनिवार्य आहे.
(ii) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.
(iii) उमेदवाराकडे स्वत:चा सॅनिटायझर असावा व त्याचा वापर आवश्यकतेनुसार करावा.
(iv) उमेदवाराने सुरक्षित अंतराचे (Social distancing) योग्य पालन करावे.
(v) मुलाखतीला येताना उमेदवाराने शक्यतो एकटे यावे. कार्यालयात नातलगांची गर्दी करु नये.
(vi) उमेदवारास कोविड सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इ. दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.
(vii) जंतुसंसर्ग टाळण्यासाठी हात न धूता नाक, तोंड व डोके यांना स्पर्श करणे टाळावे.
(viii) उमेदवार टिश्यु पेपर वापरत असल्यास वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत टाकावा.
(viv) कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी शासनाकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

ठिकाण :- मुंबई

उप सचिव (परीक्षा-१),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई .